आपण हा लेख www.maanavta.com या अध्यात्मिक वेबसाईट वर वाचत आहात.

संपादकीय

हारू नका हिंमत.....

लेखक – श्री. राम कुमार 'सेवक' जी मुख्य संपादक – www.maanavta.com

दोन प्रश्नावर आम्ही नेहमी विचार करतो की, जर असे असते तर काय झाले असते आणि जर असे नसते तर काय झाले असते? मग आम्ही आमच्या बुद्धिमत्तेच्या अश्वावर स्वार होवुन कल्पनेच्या आधारावर निष्कर्ष काढतो की,

१) जर असे असते तर असे झाले असते
२) जर असे नसते तर असे झाले असते

या दोन्ही भ्रामक कल्पनांमुळे आमच्या आयुष्यातील बराच मोठया वेळेचा अपव्यय होत असतो.

जेव्हा कुणी आपल्यापेक्षा प्रगतीच्या बाबतीत थोडाफार पुढे जातो त्यावेळी अंर्तमनात कल्पना (इच्छा) निर्माण होते की, किती चांगले झाले असते जर त्याच्या पदावर मी आसनस्थ झालो असतो.

मग आम्ही कारणांचे विश्लेषण करून सांगतो की, असे झाले असते तर हे झाले असते. मग मन अस्वस्थ होते आणि आम्ही म्हणतो, हे भगवंता! तू माझ्यासोबतच असे का केले, तसे का नाही केले, जसे त्याच्यासोबत घडले? या परिस्थतीबाबत निरंकारी बाबाजी सांगतात – ''मानवाला जर काही दु:ख आले तर तो भगवंतास दोष देतो आणि म्हणतो माझ्यासोबत असे का झाले, आणि जेव्हा कधी त्याला यशप्राप्ती होते तेव्हा कधीच सांगत नाही की, माझ्यासोबत असे का घडले. उलटपक्षी तो भगवंताबद्दल कृतज्ञता ही व्यक्ती करीत नाही. तेव्हा आपल्या यशाचे कणभर श्रेय ही भगवंतांस देण्यास त्याला योग्य वाटत नाही.

त्यावेळी आम्ही हे विसरतो की, स्थळ, काळ, परिस्थिती तर सर्वांना समान असते. तेच जग, तेच घटना चक्र, तोच देश–शहर परंतू परिस्थितीला सामारे जाण्याची पध्दत प्रत्येकाची आप–आपली असते.

कुणी अनुकूल परिस्थिती होण्याची प्रतीक्षा करतो. परंतु वेळ निघुन गेल्यावर कापाळावर हाथ मारल्याशिवाय गत्यंतर नसते. जसा जसा वेळ निघुन जातो तसे तसे आयुष्य ही कमी होते. तारूण्य निघून गेल्यावर भुतकाळातील दिवस छान वाटतात. कवि 'भाषी'' मुलतानींच्या मते –

बन्दे उत्ते बुढ़पि, जदों निशानी आन्दी ए,
उठदे–बहन्दे, खान्दे–पीन्दे याद जवानी आन्दी ए।

एका शायराने असे ही म्हटले आहे की,

गुजरा हुआ जमाना आता नही दुबारा,
हाफिज खुदा तुम्हारा.....

तारूण्याचे दिवस पुन्हा परत येत नाही, तो व्यक्ती जो पूर्वी भविष्याकडे आशाळभूत नजरेने बघत रहायचा, तोच आता वृध्दावस्थेत भूतकाळाच्या आठवणींना स्मरत राहतो.

ही त्या प्रत्येक वृध्दाची व्यथा आहे, ज्याला जीवनात ते यश मिळाले नाही, ज्याची त्याला अपेक्षा होती. ज्यावेळी शरीरात उर्जा होती त्यावेळी तो अनुकूल परिस्थितींची प्रतिक्षा करित होता. आणि जेंव्हा उर्जा शक्तीचा ऱ्हास होवु लागला, इंद्रीय शिथील होऊ लागली तेव्हा पश्चतापाच्या आगीत होरपळू लागला. आता त्याला राग स्वत:चा येतो पण खेकसतो मात्र दुसऱ्यावर, त्याचा परिणाम हा होतो की, परिवारातील सदस्य त्याला अडगळीतील वस्तु समजून, त्याच्याजवळ जाण्याचे टाळतात. तो बिचारा जो कधीतरी या विभागाचा ''नायक'' होता, तो आता ''गायब'' होऊन वृध्दपकाळारूपी शय्येवर खितपत पडला आहे.

जर भगवंताने पुरेस आर्युमान दिले आहे तर प्रत्येक युवकास एका निश्चित वयामानात वृध्दावस्था प्राप्त करावयाची आहे. त्या वयात पश्चताप करण्याची पाळी येऊ नये म्हणुन आवश्यक आहे की, ''जर असे असते तर असे झाले असते आणि जर असे नसते तर असे झाले असते'' या विषयांवर आपला बहुमूल्य वेळ वाया घालवू नये. कल्पनाशक्तीच्या आधारे कविता लिहु शकतो, शोध ही लावू शकतो, परंतु जीवन तर वास्तवतेला सामारे जावुन जगावयास लागते. या करीता वास्तवतावादी बना.

समजा माझ्यासमोर बटाटयाची भाजी आहे आणि आपल्या ओळखीतील व्यक्तीसमोर पनीरची भाजी आहे दोघांची सत्यता वेगवेगळी आहे त्याच्या समोरिल पनीरची भाजी मिळवण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा आपल्यासमोरील बटाटयाच्या भाजीचा

वापर करून भुक तरी शमवता येईल, अन्यथा दुसऱ्याचे ताटातील मिळवण्याच्या प्रयत्नात आमच्या ताटातील अन्नपदार्थावर दुसराच ताव मारून घेतो. या परिस्थीतीसाठी संत महात्मा लिहतात – दुविधा में दोनो गये – माया मिली न राम।

ही खुपच वेदनादायक स्थिती आहे, याकरीता आवश्यक आहे जी परिस्थिती आमच्या समोर आहे त्यास पुर्ण क्षमतेने सामोरे जाणे.

रिलायंन्सचे संस्थापक धिरूभाई अंबांनी याच्या व्यतिरिक्त बरेच असे लोकं आहेत, ज्यांची परिस्थिती आमच्यापेक्षा विपरीत होती, परंतु ते परिस्थितीस घाबरले नाही. त्यांनी परिस्थितीचा सखोलपणे अभ्यास केला. सर्व पर्यायांवर दूरदृष्टी ठेवून विचार केला आणि मग अंतिम पर्याय निवडला. मिळालेल्या यशाने हे सिध्द केले की त्यांनी स्विकारलेला पर्याय योग्यच होता. शेवटी त्यांचीच महनीय म्हणुन गणती होते. त्यांना कधी उपेक्षा सहन करावी लागली नाही. वाढत्या वयाबरोबर त्यांच महत्व ही अधोरेखीत होत गेलं कारण त्यांनी यशाच शिखर काबीज केले होत. त्यांच्या अनुभवाची मूल्य निरंतर वाढू लागेले.

आम्हालाही त्याच पर्यायाचा स्विकार करावयाचा आहे अथवा वृध्दपकाळी जेव्हा ताण–तणाव वाढेल आणि अनेक विकारान आम्ही पिडीत असू, त्याकरीता या म्हणीस आठवावं लागेल,

तब पछताये क्या होत,
जब चिडिया चुग गयी खेत ।

वेळेआधी जागृत व्हा एक सुची बनवा ज्याच्यात ते ध्येय/लक्ष्य लिहा जे गाठायचे आहेत पण अजुन गाठले नाहीत. महिन्यातुन एकदा तरी त्या सुचीवर नजर टाका जेणेकरून एक–एक लक्ष्याचा पाठपुरावा करून त्यांना प्राप्त करावे आणि वृध्दपकळात ही ऐटीने जीवन जगता यावे. परमपिता परमात्मा आम्हा सर्वांना प्रामणिक नितीमत्ता, परिपूर्ण क्षमता तथा दृढ संकल्पनांचे गुण प्रदान करो हीच प्रार्थना.

''हारिए ना हिम्मत बिसरिए ना राम''
(''हारू नका हिंमत, विसरू नका राम'')

राम कुमार 'सेवक'
rksewak@yahoo.co.in
अनुवादक

सुकदेव पाटील
sukdeo_behere@yahoo.co.in